| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411018. करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 267 'अ' नुसारचे अवैध बांधकामांवरील शास्तीबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/9/कावि/ 136 /2023, दिनांक 08 /03/2023 |
| **विषय :** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अवैध बांधकामांवरील कलम 267अ नुसारचे शास्ती बाबत...** |
| अंमलबजावणी कालावधी | स्थायी |
| कोणाच्या माहितीसाठी / कार्यवाहीसाठी | कर आकारणी व कर संकलन विभाग मुख्य कार्यालय व विभागीय कार्यालय |
| संदर्भ | 1. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील पत्र क्रमांक पीसीसी-3019/प्र.क्र.106/नवि-22, दिनांक 08 मार्च 2019<br>2. परिपत्रक क्र. – कर/मुख्य/-9/कावि/234/2019, दि. 08 मार्च 2019<br>3. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. लवेसू-2022/प्र.क्र. 506/ नवि-22 दि. 03 मार्च, 2023 |

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 127 व 129 मधील तरतूदीनुसार शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ता कराची आकारणी करणेत येते. अधिनियमातील कलम 267 'अ' मधील तरतूदीनुसार महानगरपालिका हद्दीतील दिनांक 04 जानेवारी 2008 रोजी किंवा त्यानंतर अस्तित्वात आलेल्या अवैध बांधकामावर संदर्भ क्रमांक 01 चे शासन आदेशानुसार व त्यास अनुसरुन संदर्भ क्रमांक 02 नुसार शहरातील अवैध बांधकामावर शास्ती रक्कमेची आकारणी व वसूलीची कार्यवाही करणेत येत आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाने संदर्भ क्रमांक 03 चे शासन निर्णयानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अवैध बांधकाम शास्ती रक्कमेचे प्रमाण मूळ करापेक्षा जास्ती असल्याने शास्ती भरणा करणेबाबत मालमत्ताधारकात उदासीनता आढळून येत आहे. भविष्यात शास्ती माफ होईल, या अपेक्षेने मालमत्ताधारक शास्तीसह मूळ कराचाही भरणा करीत नाहीत. त्यामुळे शास्ती माफ केल्यास मूळ कराचा भरणा होईल व स्थायी उत्पन्नात वाढ होईल या हेतुने पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सर्व अवैध बांधकामांना देय असलेली शास्ती माफ केली आहे. सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने सर्व अवैध बांधकामावरील शास्ती माफीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1. शासन निर्णयानुसार सर्व अवैध बांधकामावरील शास्ती माफीचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. म्हणजेच निवासी, बिगरनिवासी, मिश्र, औद्योगिक अशा सर्व अवैध बांधकामावरील शास्ती माफ झाली आहे.,. असे स्पष्ट होते. शासन निर्णयात मालमत्ताधारकांनी मूळ कराचा भरणा केलेनंतर शास्ती माफ करणेत येईल., असे नमूद असल्याने, त्यानुसार सर्व अवैध बांधकामावरील ज्या मालमत्ताधारकाकडे मूळ कराची थकित रक्कम आहे. अशा मालमत्ताधारकांनी मूळ कराचा भरणा केले नंतर अवैध बांधकामावरील शास्ती माफ करणेस, तसेच ज्या मालमत्ताधारकांनी शासन निर्णयापूर्वी

मुळ कराचा भरणा केला आहे, मात्र अवैध बांधकामावरील शास्ती थकित आहे. अशा मालमत्ताधारकांची शास्ती माफ करणेस मान्यता देणेत येत आहे.

2. शासन निर्णयात अवैध बांधकाम शास्ती माफी ही शासन आदेश निर्गमित होण्याच्या दिनांकापर्यंतच्या सर्व अवैध बांधकामांना लागू राहिल असे नमूद आहे. त्यानुसार दि.०३ मार्च, २०२३ पर्यंतच्या कर आकारणी झालेल्या सर्व अवैध बांधकामांना कायमस्वरुपी शास्ती माफी झालेचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे यापुढे या मालमत्तांना शास्ती आकारणी लागू न करणेस मान्यता देणेत येत आहे.

3. शासन निर्णयानुसार दि.०३ मार्च, २०२३ पर्यंतच्या अवैध बांधकामांना शास्ती यापूढे देखील लागू राहणार नाही. तथापि, शहरामध्ये दि.०३ मार्च, २०२३ पूर्वी बांधकामे पूर्ण झालेली., परंतू, आकारणी न झालेली अशी अनेक नविन / वाढीव अवैध बांधकामे अस्तित्वात असणेची शक्यता आहे. अशा सर्व नविन / वाढीव अवैध बांधकामावर यापूढे आकारणी नोंदीची कार्यवाही करतांना सदर बांधकाम दि.०३ मार्च, २०२३ पूर्वी अस्तित्वात असलेबाबतची सबळ पूराव्याची माहीती, कागदपत्रे जसे की, लाईट बिल, पाणी बिल शॉप ऍक्ट लायसन, व्यवसाय / उद्योग धंदा परवाना इ. घेऊन, खातरजमा करुन कार्यवाही करणेस, तसेच सदर बांधकाम दि.०३ मार्च, २०२३ पूर्वीचे असल्यास अशा अवैध बांधकामास शास्ती माफी देणेस मान्यता देणेत येत आहे.

4. शासन निर्णयानुसार शासन आदेश निर्गमित दिनांकानंतर म्हणजे दि.०४ मार्च, २०२३ नंतरच्या अवैध बांधकामांना दि.०८ मार्च, २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार अवैध बांधकाम शास्ती लागू राहणार आहे. त्यामुळे दि.०४ मार्च, २०२३ रोजीच्या व त्यानंतरच्या सर्व नविन / वाढीव अवैध मालमत्तेचे बांधकामावर आकारणी करतांना दि.०८ मार्च, २०१९ चे शासन आदेशाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे शास्ती आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | आकारावयाच्या शास्तीचा दर |
|---|---|---|
| 1 | 1000 चौ फूटापर्यंतचे निवासी बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये. |
| 2 | 1000 ते 2000 चौ फूटापर्यंतचे निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या 50% दराने शास्ती |
| 3 | 2000 चौ फूटापुढील निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती |
| 4 | सर्व बिगरनिवासी, मिश्र, औद्योगिक मालमत्ता बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती |

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
स्थापना
११/१०/१९८२
पिंपरी-४११०१८

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति : 1) कर आकारणी व कर संकलन विभाग व सर्व कर संकलन विभागीय कार्यालये

प्रत : 1. लेखा विभाग, 2. मुलेप विभाग, 3. माहिती व तंत्रज्ञान विभाग

4. टेक नाईन सर्व्हीसेस प्रा.लि.

2/- उपरोक्त परिपत्रकात नमूद केलेनुसार संगणक आज्ञावलीत तात्काळ बदल करावेत